महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

विभागीय कार्यालय नाशिक,

साई आनंद संकुल, ऑफिस क्र.6/7, तिसरा मजला, टिळक पथ, बिटको पॉईंट नाशिक रोड, नाशिक-422 101

दुरध्वनी : (0253) 2461112/8149199752 Email : - nasik.ro@mswc.in

संकेतस्थळ :- mswcinfo@mswarehousing.com

निविदा (Short Tender Notice)

शास्त्रोक्त पद्धतीने बांधलेली सुसज्ज गोदामे लॉक अँड की पद्धतीने भाडेतत्वावर देणे बाबत...

नाशिक विभागातील महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचे सिन्नर(माळेगाव MIDC) वखार केंद्र, प्लॉट नं.E-9, माळेगाव-सिन्नर MIDC, ता. सिन्नर, जि.नाशिक, पिन-422 113 येथील शास्त्रोक्त पद्धतीने बांधलेले सुसज्ज गोदाम क्र. 01, 02 व 03 (क्षमता प्रत्येकी 1580 मे.टन/ प्रत्येकी 9494 चौ.फुट) 24 तास पाणी, विद्युत पुरवठा व सुरक्षा भिंतसह 5 वर्षाकरिता (3+2) लॉक ॲन्ड की भाडेतत्वावर रु. 14.70/- प्रति चौरस फुट प्रति माह व GST करासहित दरवर्षी 5% भाडेवाढसह किंवा त्यापेक्षा जास्त दराने भाडेतत्वावर देणे आहे. तरी इच्छुकांनी दरपत्रक निविदा सिलबंद पाकिटात वरील पत्त्यावर दि. 18.11.2026 रोजी सायंकाळी 04.00 वाजेपर्यंत पोहोच होतील अशा बेताने पाठवाव्यात किंवा स्वतः प्रत्यक्ष पोहोच कराव्यात.

अटी व शर्ती :-

1) निविदा मध्ये प्रति चौरस फुट प्रति माह दर व GST कर (भारतीय चलनात) नमूद केलेले असावे.

2) निविदा ह्या सीलबंद पाकिटात विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ साई आनंद संकुल, ऑफिस क्र.6/7, तिसरा मजला, टिळक पथ, बिटको पॉईंट, नाशिक रोड, नाशिक-422 101 यांच्या नावाने पाठवाव्यात.

3) सिलबंद पाकिटावर निविदा धारकाचे संपूर्ण नाव, पत्ता, ई-मेल व दुरुध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक लिहावा.

4) प्राप्त निविदा दि. 18.11.2026 रोजी दुपारी 04.15 वाजता विभागीय कार्यालय, नाशिक येथे उघडण्यात येतील. ज्या निविदा धारकांना उपस्थित राहायचे असेल त्यांनी स्व-खर्चाने उक्त वेळेत वरील पत्त्यावर स्वत: उपस्थित राहावे.

5) प्राप्त निविदा मध्ये ज्या निविदा धारकाचे दर जास्त असतील अथवा जो निविदा धारक जास्त दर देण्यास तयार असेल त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

6) दरपत्रक मंजूर निविदा धारकास वखार महामंडळाच्या अटी व शर्ती करारनाम्यानुसार लागू राहतील.(अटी व शर्थी कार्यालयात पहावयास मिळतील)

7) गोदामाच्या इमारतीचा विम्याची जबाबदारी वखार महामंडळाची असेल तर गोदामात भाडेकरूंनी साठवलेल्या मालाची विमा जबाबदारी भाडेकरू यांची राहील.

8) सहा महिन्याच्या भाडे रकमेएवढी रक्कम विना व्याज सुरक्षा तारण ठेव रक्कम म्हणून महामंडळाकडे करारनामा करणेपूर्वी जमा करावी लागेल.

* वरील सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवलेला आहे.

-सही-
विभागीय व्यवस्थापक,
नाशिक विभाग